# स्वच्छता जनजागृती करणाऱ्या गणेश मंडळांना महापालिकेतर्फे बक्षीसांचा वर्षाव

### नोंदणी निशुल्क, १८ मंडळांना मिळणार पुरस्काराचा बहुमान

**नांदेड दि. ५ :** स्वच्छता जनजागृती करणाऱ्या गणेश मंडळांना बक्षीसे देऊन गौरविण्याचा निर्णय महापालिकेने घेतला असून त्याकरीता क्षेत्रीय कार्यालयनिहाय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही. ६ क्षेत्रीय कार्यालयांतर्गतच्या स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या एकूण १८ गणेश मंडळांमधून शहर स्तरावर ३ मुख्य पुरस्कार देण्यात येणार आहेत.

नांदेड शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकांची आहे. शहरात गोळा झालेला कचरा वाहून त्याची इतरत्र विल्हेवाट लावण्याची जबाबदारी महापालिकेची आहे. स्वच्छतेसंदर्भात विविध संस्थेच्या माध्यमातून संवादमंथन करून, विविध भागात कार्यशाळा आयोजित करून मनपाच्यावतीने जनजागृतीचे काम सुरू आहे. या मोहिमेला नागरिकांमधून चांगला प्रतिसाद मिळत असून नागरिक आता आपल्या दररोजच्या कामातील कांही वेळ स्वच्छतेच्या उपक्रमासाठी कर्तव्य म्हणून राखून ठेवत आहेत.

स्वच्छतेची जाणिव युवक, महिला, मुले व अबालवृद्धांमध्ये निर्माण होण्यासाठी गणेश मंडळांना प्रोत्साहित करण्याची भुमिका मनपाने स्विकारली आहे. त्याकरीता गणेश मंडळाने आपल्या परिसरात ठेवलेली स्वच्छता, नागरिकांमध्ये केलेली जनजागृती, विसर्जनाच्या वेळी पर्यावरणाची घेतलेली काळजी, त्यातून झालेले फलित, मंडळांने दाखवलेली विशेष कल्पकता, महिला व मुलांचा सहभाग जनजागृतीसाठी वापरलेली साधने, उपक्रम यासह अनेक बाबी पुरस्कारासाठी पात्र ठरणाऱ्या गणेश मंडळाला पूर्ण कराव्या लागणार आहेत. नांदेड मनपा क्षेत्रात एकूण ३३९ गणेश मंडळे आहेत. ही सर्व मंडळे या स्पर्धेत भाग घेण्यासाठी पात्र ठरतील. स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही. परंतु स्पर्धेत भाग घेण्यासाठी इच्छुक असलेल्या गणेश मंडळांना दि. ८ सप्टेंबर २०११ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत त्या-त्या भागातील क्षेत्रीय कार्यालयात नोंदणी करणे आवश्यक आहे. जेणेकरून संबंधीत गणेश मंडळांच्या उपक्रमाची माहिती घेणे सोयीचे ठरेल.

मनपा अंतर्गत येणाऱ्या क्षेत्रीय कार्यालय क्र. १, २, ३, ४, ५ व ६ या सहा कार्यालयांतर्गत प्रत्येक प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या मंडळास अनुक्रमे पाच हजार, तीन हजार व दोन हजार अशी बक्षीसे देण्यात येतील. या सहाही क्षेत्रीय कार्यालयातून येणाऱ्या पहिल्या तीन मंडळातून शहरासाठी स्वतंत्र पहिले तीन बक्षीसे दिल्या जातील. यात सर्वप्रथम येणाऱ्या मंडळास एकवीस हजार, द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्या मंडळास अकरा हजार व तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या मंडळास पाच हजार रूपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. महापौर अजयसिंह बिसेन व आयुक्त डॉ निपुण विनायक यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेत पात्र ठरणाऱ्या गणेश मंडळांची निवड करण्यासाठी परीक्षक समिती नेमली जाणार आहे.

# मनपात आज लोकशाही दिन

**नांदेड दि. :** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत उद्या मंगळवारी (दि. ६ सप्टेंबर २०११) सकाळी १० ते १२ या वेळेत मनपा प्रशासकीय इमारतीत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १.३० वाजता मनपा क्षेत्रातील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यात येईल. सर्व संबंधीतांनी याची नोंद घ्यावी, असे मनपा उपायुक्त (प्रशासन) शशीमोहन नंदा हे कळवतात.